ISSN 2231-5063
Volume-3, Issue-2, August-2013

माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत राजकीय पक्ष..

शुभांगी राठी , बी. आर. वानखेडे
एम.ए., पीएच.डी पी.के. कोटेचा महिला महाविद्यालय, विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
एम.ए. राज्यशास्त्र

सारांश :केंद्रीय माहिती आयोगाने राजकारणात पारदर्शकता आणण्यासाठी राजकीय पक्षांना माहिती अधिकाराच्या कक्षेत आणण्याचे निर्देश दिले आहेत. देशात काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, बहुजन समाज पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे सहा राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्ष माहिती अधिकाराच्या कक्षेत येतात असा आयोगाने निर्णय घेतला आहे.

प्रस्तवाना :

माहितीच्या अधिकाराने, माहितीच्या लोकशाहीच्या राज्यात आम्ही वावरायला लागलो. यालाच सुराज्याच्या दिशेने जाणारे दुसरे स्वातंत्र्य संबोधले. घटनात्मक मुलभूत हक्क असणारा माहितीचा अधिकार मिळविण्याचा संघर्शमय कालखंड संपला व कायद्याच्या अंमलबजावणीचा व त्यातील व्यावहारीक अडथळयांचा आव्हानात्मक असा कालखंड सुरु झाला. माहितीच्या अधिकार कायद्याने नवनव्या वादळांना सुरुवात झाली आहे. मग ते राजकीय पक्षांना माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत आणण्याचे असो किंवा माहिती अधिकार कायदा हा सहकार कायद्याशी 97व्या घटना दुरुस्तीने जोडून सहकार महर्षी म्हणवून घेणाऱ्यांना चाप बसविणारा आहे. एका मागुन एक नविन वादळं निर्माण होण्याची शक्यता या माहिती अधिकार कायद्याने निर्माण झालेली आहेत. संसदीय लोकशाहीमध्ये माहिती अधिकार कायदा हा अत्यावश्यक असून तो प्रगल्भपणे राबविला जावा व त्यातून राजकीय पक्षांना सुद्धा सूट मिळू नये ही जनभावना निर्माण झालेली आहे.

'प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाचे कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखाली माहिती नागरिकांना मिळविता यावी म्हणून नागरिकांच्या माहिती मिळविण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पद्धती आखून देण्याकरिता केंद्रीय माहिती आयोग घटीत करण्याकरिता आणि तत्संबंधीत किंवा तद्नुशंगीक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम'

'भारताच्या संविधानाद्वारे लोकशाही गणराज्याची स्थापना करण्यात आलेली आहे.'

लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समुह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी तिच्या कार्यशिलतेच्या दृष्टीने तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे आणि ज्या अर्थी प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोशीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितींची गोपनियता राखणे या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्चता कायम राखतांना या परस्पर विरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

वरील विवेचनातून शासनाने माहिती अधिकार कायदा 2005 अमलात आणतांना भ्रष्टाचाराचे उच्चाटन होण्यासाठी व्यापक जनहिताचा विचार केलेला आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील भ्रष्टाचाराची पाळे–मुळे खोदून काढून संपूर्ण स्वच्छ व पारदर्शकता येण्याचा उद्देश त्यातून दिसून येतो. भ्रष्टाचार मुळापासून निपटला जावा हे प्रत्येक राजकिय पक्षाचे मत आहे. परंतु प्रत्येक राजकीय पक्षातील व्यक्ती कमी अधिक प्रमाणात भ्रष्टाचारात गुंतलेले आहेत. काँग्रेस, भाजप, कम्युनिस्ट पक्ष, इ. प्रत्येक पक्षातील व्यक्ती या भ्रष्टाचारात अडकलेल्या आहेत. ज्या पक्षाचे व्यक्ती भ्रष्ट आहेत म्हणून तो पक्ष भ्रष्ट नाही, परंतु भ्रष्ट व्यक्तींचा पक्ष हा भ्रष्ट नाही का?माहिती अधिकार कायद्याची व्याप्ती खूप मोठी आहे. त्यात शासनाचे प्रत्येक खाते अंतर्भूत आहे. मग राजकीय पक्ष माहिती अधिकार कायद्यात का नको?

माहिती अधिकार कायद्याची वैशिष्ट्ये :

1) प्रगल्भ लोकशाहीसाठी माहितगार नागरिक व नागरिकांचे समूह घडविणे.
2)नागरिकांचा शासन कारभारातील सहभाग वाढविणे.
3)राज्य कारभारात पारदर्शकता व खुलेपणा आणणे.
4)शासन यंत्रणेमध्ये नागरिकांच्या प्रती उत्तरदायित्व निर्माण करणे.
5)राज्य कारभार व व्यवस्थेतील भ्रष्टाचारास आळा घालणे.
6)माहिती मिळविण्यासाठी व्यवहार्य यंत्रणा उभारणे.

वरील माहिती अधिकार कायद्याची वैशिष्ट्ये ही राजकीय पक्षांना लागू करतांना राजकीय पक्षांचे कार्य माहितगार नागरिकांचा समूह घडविणे नाही का?

शेवटी शासन हे कुठल्यातरी राजकीय पक्षाचेच असणार. मग राज्य कारभारात पारदर्शकता आणून व्यवस्थेतील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी राजकीय पक्षच पुढे येऊ शकतात. पण संवेदनाच बोथट झाल्यावर काय करणार?

भ्रष्टाचाराची शेकडो प्रकरणेही राजकीय व्यक्तींची आहेत. काल परवा पर्यंत पायी रस्त्याने किंवा सायकलने फिरणारी व्यक्ती साधी नगर सेवकाची निवडणूक वार्डातून जिंकल्यावर आलिशान बंगल्यात रहायला जाते व आलिशान गाडीत फिरतांना आपल्याला दिसून येतात. भ्रष्टाचारात प्रत्येक पक्षातील व्यक्तींची नावे आलेली आहेत. टेलिकॉम घोटाळा, सिमेंट घोटाळा, चारा घोटाळा, तेलाचा घोटाळा घरकूल घोटाळा इ. असे प्रत्येक क्षेत्रात घोटाळे झालेले आहेत. नांवे नमूद करण्याची गरज नाही. असे अनेक ''आदर्श'' पहायला मिळाले. सत्ता आणि राजकीय पक्ष यांची साठगाठ आहेच. भ्रष्टाचार हा केवळ आर्थिकच नाही तर सामाजिक क्षेत्रातही भ्रश्टाचार आहे. माहिती अधिकार कायद्याच्या वैशिष्ट्यांमध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, या कायद्याने प्रगल्भ लोकशाही निर्माण करावयाची आहे व त्यासाठी माहितगार नागरीक व नागरिकांचा समूह घडवायचा आहे.

जगाच्या नकाशाकडे नजर टाकली तर जे देश आर्थिक, औद्योगिक, सामाजिक दृष्ट्या विकसित किंवा विकसनशिल आहेत आणि जेथे सामाजिक जाणिव प्रगल्भ असल्याने लोकशाही शासन आहे त्याच देशांमध्ये हा प्रागतीक कायदा अंमलात आल्याचे दिसून येते.

केवळ लोकांनी लोकांसाठी चालविलेले लोकशाही शासन नसून त्या देशातील नागरिकांमध्ये आपल्या कर्तव्य व जबाबदारीची जाणीव असणे आवश्यक आहे. तेंव्हाच लोकशाही यशस्वीतेकडे वाटचाल करु शकते. जनसहभाग हा लोकशाहीचा महत्वचा पैलू आहे. त्यासाठी राजकीय पक्ष महत्वाची भूमिका बजावू शकतात.

राज्यकर्ते व नोकरशाह यांच्या विरोधाला न जुमानता नागरिकांच्या भाशण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्यातच हा माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे अशी न्यायालयाने वेळोवेळी भूमिका घेतलेली आहे. भारतीय राज्यघटनेच्या तत्वज्ञानातच माहितीच्या अधिकाराचे मूळ आहे असे न्यायपालिकेने मानलेले आहे.

केंद्रीय माहिती आयोगाचा राजकारणात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न :

केंद्रीय माहिती आयोगानी आपल्या एका महत्वाच्या निर्णयात राजकीय पक्षांनाही माहिती अधिकाराच्या कक्षेत आणलेले आहे. यामुळे राजकीय पक्षांमध्ये अस्वस्थता निर्माण झालेली आहे.

राजकीय पक्षांना माहिती अधिकार कायदा का लागू असावा ?

माहिती अधिकार कायद्याच्या कलम 2(एच) मध्ये म्हटले आहे की, सर्व पब्लीक ॲथॉरिटी (सरकारी संस्था) या कायद्याच्या कक्षेत येतात. जर राजकीय पक्ष सरकारकडून करात सवलत, सवलतीच्या दरात जमीन आणि बंगले घेत असतील

ISSN 2231-5063
Volume-3, Issue-2, August-2013

तर ते आपोआपच पब्लीक ॲथॉरिटी होतील. यापूर्वी केंद्रीय माहिती आयोग आणि सर्व राज्यांच्या माहिती आयोगांनी सुमारे 500 प्रकरणांमध्ये विविध अशासकिय संस्थांना सार्वजनिक संस्था मानून माहिती अधिकाराच्या कक्षेत ठेवले आहे.

केंद्रीय माहिती आयोगाने राजकारणात पारदर्शकता आणण्यासाठी राजकीय पक्षांना माहिती अधिकाराच्या कक्षेत आणण्याचे निर्देश दिलेले आहेत. देशात बहुजन समाजपक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, काँग्रेस हे सहा राष्ट्रीय मान्यता प्राप्त पक्ष माहिती अधिकाराच्या कक्षेत येतात असा आयोगाने निर्णय घेतलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच म्हटले आहे की, जी व्यक्ती निवडणूक लढवेल तीला आपल्या संपत्तीसह गुन्हेगारीचा रेकॉर्ड आणि प्रत्येक गोश्टीची माहिती लागेल, भलेही ती व्यक्ती निवडणूकीत पराभूत झाली असेल तरीही तीला ती माहिती द्यावीच लागेल, जेणेकरुन जनतेला ज्या लोकप्रतिनिधीला निवडून देत आहोत त्याच्या बाबतीत अधिक जाणून घेता येईल. अशा वेळी जर जनता राजकीय नेता किंवा निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीत सर्व काही जाणून घेऊ शकते तर राजकीय पक्षांच्या बाबतीत जनतेने का जाणून घेऊ नये?

जनतेला पक्षांतर्गत लोकशाहीची माहिती व्हावी. हा राजकिय पक्षांना माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत आणण्याचा उद्देश आहे आणि हा जनतेचा अधिकार आहे. अशा वेळी राजकीय पक्षांनी घाबरुन चालणार नाही. लोक आपल्याला ज्याचे उत्तरे देणे योग्य नाही असेही अनेक प्रश्न विचारतील अशी भिती राजकीय पक्षांना आहे. खरे तर हा कायदा 2005 पासून लागू झाला आहे. परंतु एखादी संस्था किंवा कार्यकारीणीला या कायद्याने नष्ट केलेले आहे असे आजपर्यंततरी पहायला मिळालेले नाही. अशा वेळी राजकीय पक्षांना त्याची भिती वाटण्याचे कोणतेच कारण नाही. जर खरेच पारदर्शकता असेल, तर चूका समोर येतील आणि त्या सुधारल्याही जाऊ शकतील. माहितीचा अधिकार देणारी काँग्रेस स्वतःच आता त्याच्या कक्षेत येण्यास तयार नाही. सहा राष्ट्रीय पक्षांना आरटीआय च्या कक्षेत आणण्याच्या केंद्रीय माहिती आयोगाच्या निर्णयाला अनेक राजकीय पक्षांनी विरोध दर्शविलेला आहे. निर्णय स्विकारार्ह नाही. यामुळे लोकशाही व्यवस्था कमकुवत होईल असे काँग्रेस आता म्हणत आहे. भाजप हे घटनात्मक संकट असल्याचे म्हणतात. पक्ष सगळी माहिती निवडणूक आयोगाला देत असतात. त्यामुळे आरटीआयची गरज नाही. आम आदमी पार्टीने मात्र या निर्णयाचे स्वागत केले आहे. एकंदरीत आता राजकिय पक्षांचा आरटीआयच्या अधिकार कक्षेत येण्यास विरोध आहे.

राजकीय पक्ष म्हणजे एखादी विचार सरणी. देशासमोरचा राजकीय आर्थिक कार्यक्रम आणि समाजातील त्यात्या पक्षाला म्हत्वाचे वाटणारे अग्रक्रमाचे विभाग यावर आधारीत संघटना असते. संघटना याचा अर्थच विचारांची, निर्णयाची आणि व्यवहाराची एकवाक्यता. राजकीय संघटनात्मक एकवाक्यता हा कोणत्याही राजकीय संघटनेचा गाभा असतो. केंद्रीय माहिती आयोगाच्या निर्णयानंतर (3 जून 2013 चा निर्णय) सर्व राजकीय पक्षांना माहिती अधिकाराच्या कक्षेत आणले. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांना आपल्या देणग्या आणि खर्चाची माहिती सार्वजनिक करावी लागेल. माहिती आयोगाचे असे म्हणणे आहे की, राजकीय सरकारकडून प्रत्यक्षरित्या आर्थिक मदत प्राप्त करुन घेतात, त्यामुळे ते जनतेला उत्तर देण्यासाठी बांधील आहेत. मात्र या निर्णयाचा अनेक पक्ष विरोध करीत आहेत. विरोधी पक्षांनी भडकाऊन दिल्यास कोणतीही व्यक्ती, काहीही माहिती विचारेल, तथापी समाजातील बराचसा मोठा वर्ग या निर्णयाचे स्वागतच करीत आहे.

या निर्णयामुळे संपूर्ण राजकिय व्यवस्था पारदर्शक होईल. भ्रष्टाचार समुळ नष्ट होईल असा दावा करता येणार नाही मात्र भ्रष्ट राजकारण्यांना या कायद्याची भिती वाटेल, धाक निर्माण होईल म्हणून सर्वच राजकिय पक्षांनी माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत येण्यास विरोध न करता या निर्णयाचे स्वागतच केले पाहिजे.

संदर्भ –

1)केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005
2)जगतराव सोनवणे, (2006) : सरकारी कर्मचारी आणि माहितीचा अधिकार, सोनादिपा पब्लीशर्स, धुळे.
3)कौल एस. के. (2005) : माहितीचा अधिकार अधिनियम, युनिव्हर्सल लॉ, जळगांव
4)माहितीचा अधिकार अधिनियम 2005 (2010)., राजहंस प्रकाशन, पुणे,
5)कचरे प्रल्हाद आणि गायकवाड शेखर (2011) : कायदा माहितीचा अन अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे
6)दै. लोकमत,
7)दै. दिव्य मराठी
8)दै. सकाळ